श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
पोस्ट-शिर्डी-४२३१०९, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.
फोन नं. ०२४२३-२५८५००, फॅक्स नं. ०२४२३-२५८७७०
Website:-www.sai.org.in

## सिलबंद दरपत्रक मागणी सूचना - पहिली मुदतवाढ

नवीन दर्शनरांगेत श्री साईबाबा मंदीरातील लाईव्ह दर्शन साईभक्तांना दाखविण्याकामी बसविण्यात आलेले एकुण टिव्हीची संख्या १५२ नग असुन त्यासाठी लागणारे इतर अनुषंगीक साहित्य बसविण्यात आलेले आहेत. या यंत्रणेचे दुरुस्ती देखभालीचे कामेAMC द्वारे करुन घेणेकामीइच्छुक दरपत्रकधारकांकडून खाली नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार सिलबंद दरपत्रके मागविणेत येत आहेत .

**तपशील खालीलप्रमाणे –**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | रक्कम(विना टॅक्स) |
|---|---|---|---|
| 1. | १५२Samsungकंपनीचे LED TV व त्यासाठी लागणारे Cable,Network,Switch, Rack,Optic Fiber Cable इ. सर्व साहित्य व AMC च्या कालावधीतवार्षिक देखभाल/दुरुस्तीकामी कार्यस्थळावर १ Engineer / Technicianपुर्ण वेळ उपलब्ध ठेवणे. | ०२वर्ष. (कार्यादेश स्वीकारले पासुन पुढील ०२ वर्ष) | |
| एकुण रक्कम - | | | |

**अ)सोबत आवश्यक कागदपत्रे**

१) पॅन कार्ड आणि जीएसटी नोंदणीची छायांकित प्रत.
२) इच्छुकनिविदाधारक अधिकृत विक्रेता/भागीदार/सेवा केंद्र नोंदणीआवश्यक आहे,
३) AMC चे दरावर लागणारे वेळोवेळीचे शासकीय कर त्या त्या वेळेच्या दरानुसार लागु राहतील.

**ब) कामाची व्याप्ती**

१) वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार (AMC) हा संपूर्णपणे ऑन-साइट दुरुस्ती देखभाल करार असेल.
२) कोणताही स्पेअरपार्ट नादुरुस्त/खराब किंवा तो बदलवयाचा असल्यास त्यांचा तांत्रिक तपशील व त्याचे अंदाजे बाजार मुल्यांकन देणे हे बंधन कारक असेल व साईबाबा संस्थान त्यांचे नियमाप्रमाणे सदरील स्पेअरपार्टची खरेदी करुन निविदा धारकास देण्यात येईल सदरील स्पेअरपार्ट बसवविण्याची जबाबदारी इच्छुक निविदाधारकाची असेल.
३) संबंधीत अभियंता/टेक्नेशीयन हा पुर्ण वेळ साईबाबा संस्थानचे नवीन दर्शनरांग येथे उपलब्ध ठेवावालागेल तसेच कामाच्या सोई-नुसार अभियंता/टेक्नेशीयन यांना कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त हजर राहवे लागेल.
४) कंत्राटदाराने टिव्हीची देखभाल/दुरुस्तीसाठी कॉल केल्यानंतर 24x7 सुनिश्चित राहील.
५) टिव्हीचे सर्व साहित्य वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार (AMC) कार्यदेश स्विकारले पासुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी वैधराहील.

**क)कामाचे स्वरुप –**

१) सर्व टिव्ही चालु असले बाबत दैनंदिन शहानिशा करणे.
२) Cable,Network, Rack,Optic Fiber Cable यांच्या संरचना(diagram) अवगत करुन घेणे तसेच वेळोवळी स्वीच व केबल खराब झाल्यास त्यांची व्यवस्था करणे व केबल खराब / कट झाल्यास त्या जागी नवीन केबल टाकणे अथवा जोडणे इतर सर्व कामे करावी
३)उत्पादीत कंपन्यांनी टिव्हीसाठी अद्यावत ऑपरेटींग सिस्टींम उपलब्ध करुन दिले असेल तर ते अपडेट करुन देणे त्यासाठी इंटरनेट आवश्यक असल्यास ते संस्थान मार्फत देण्यात येईल.
४) टिव्ही बंद झाल्यास ते चालु करण्याची व्यवस्था करणे.
५) दुरुस्ती/देखभालीसाठी लागणारे सर्व Tools / Equipment संबंधीत इच्छुक निविदाधारकांनी स्वतः उपलब्ध ठेवणे.
६) पुरवठा धारकांनी अभियंता/टेक्निशीयन यांना सुरक्षीतेचे सर्व नियम पाळणे बंधन कारक असेल. त्याची सर्व जबाबदारी (वित्त,जीवतहानी,कार्यालयीन नियम, कर्मचायांशी सुसंवाद व्यवस्थित ठेवणे. ) हि सर्व जबाबदारी इच्छुक निविदाधारकांची राहिल.
७) दैनंदिन हजेरी मस्टर ठेवणे इच्छुकनिविदाधारकास बंधन कारक राहिल.

**ड) अटी आणि नियम.**

१) उत्सवाचे व गर्दीच्या काळात आवश्यकतेनुसार व गरजेनुसार जादा वेळ थांबणे बंधनकारक राहील.
२) AMC चे बिल हे त्रैमासिक अदा केले जातील परंतु त्रैमासिक बिल अदा करतांना अभियंता/टेक्नेशीयन यांचेहजेरी रजिस्टर झेरॉक्स/रजिस्टर सादर करणे बंधनकारक असेल.
३) कामाच्या ठिकाणी संबंधीत अभियंता/टेक्नेशीयन यांचे कडुन काही अनुचित प्रकार/ अपघात घडल्यास सर्वस्वी जबाबदारीसंबंधीत इच्छुक निविदाधारकांची असेल.
४) AMC कालावधीत संस्थांनचे कोणतीही वस्तु अभियंता/टेक्नेशीयन यांचे चुकीमुळे/निष्काळजीपणामुळे खराब झाल्यास किंवा गहाळ झाल्याससंबंधीत इच्छुक निविदाधारकांकडुन वसुल केले जाईल.
५) टिव्ही बाबत तक्रार असल्यास 24 तासांच्या आत त्याचे निवाराण करणे अनिवार्य राहिल अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
६) नादुरुस्त व खराब झालेले स्पेअर पार्ट व सुटे साहित्य संस्थान प्रतिनिधीकडे सुपूर्द केले जावे आणि त्याची तक्रार निवारण रजिस्टरला नोंद करावी.
७) टिव्हीची देखभाल /दुरुस्तीची संपूर्ण कामकाजाच्या सुस्थितीत ठेवणे ही इच्छुक निविदाधारकांची मुख्य जबाबदारी असेल.
८)कोणतेही अगर सर्व दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखुन ठेवला आहे.
९)आपलेदरपत्रक उपरोक्तप्रमाणे स्वताःचे फर्मचेलेटरहेडवर मोहोर बंद पाकीटात पाठविणे. तसेच दि.७/८/२०२४पर्यंत वरील अटी/शर्तीत अधीन राहुन तातडीने पाठविण्याचे करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
१०) निविदा व निविदा प्रक्रियेचे सर्व हक्क संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेले आहेत.

**इ) दरपत्रकसादरकरणे :-**

| |
|---|
| सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग दरपत्रक - नवीन दर्शन लाईन LED TV देखभाल/दुरुस्ती AMC- |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. |
| मु.पो.-शिर्डी. ता. राहाता. |
| जिल्हा - अहमदनगर |
| पिनकोड-423109 |

मसुदा मान्यतेसाठी.

Signed by Goraksha Mahadeo Gadilkar
Date:15.07.2024 16:58:05

(गोरक्ष गाडीलकर)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.